**<u>ठळक बातम्या</u>**

- एकोणऐंशीव्या स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू थोड्याच वेळात देशवासीयांना संबोधित करणार

- स्वातंत्र्य दिनाची सर्वत्र जय्यत तयारी, उद्या प्रधानमंत्र्यांच्या हस्ते लाल किल्ल्यावर मुख्य कार्यक्रम

- स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर १ हजार ९० जणांना शौर्य आणि सेवा पदकं जाहीर, राज्यातल्या ७० जणांचा समावेश

- बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातल्या सदनिकांचं वितरण, याच धर्तीवर धारावी प्रकल्पही पूर्ण होईल, असा मुख्यमंत्र्यांना विश्वास

**आणि**

- वाहनांना HRSP नंबर प्लेट बसवण्याकरता ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

**<><><><><>**

देशाच्या एकोणऐंशीव्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू थोड्याच वेळात देशाला संबोधित करणार आहेत. हे संबोधन संध्याकाळी सात वाजल्यापासून आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व केंद्रांवरून प्रसारित केलं जाईल. त्यानंतर या संबोधनाचं इंग्रजी भाषांतर प्रसारित होईल. या संबोधनाचा स्थानिक भाषांमधला अनुवाद रात्री साडेनऊ वाजता प्रसारित होणार आहे. आकाशवाणी मुंबई केंद्रावरचा वृत्तविशेष हा कार्यक्रम आज रात्री साडेआठ वाजता प्रसारित होईल.

**<><><><><>**

देश एकोणऐंशीवा स्वातंत्र्यदिन साजरा करण्यासाठी सज्ज होत आहे. नागरिकांच्या उत्साहाला उधाण आलं असून नव्या आकांक्षा, नवी स्वप्नं आणि नव्या आशा यांचा जागर उद्या साजऱ्या होणाऱ्या या राष्ट्रीय सणाच्या निमित्तानं केला जात आहे. स्वातंत्र्यदिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ऐतिहासिक लाल किल्ल्यावर राष्ट्रध्वज फडकवतील आणि किल्ल्याच्या तटावरून देशाला संबोधित करतील. स्वातंत्र्य दिनाची यंदाची मध्यवर्ती संकल्पना ‘नवा भारत’ अशी आहे. यंदा स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमांमध्ये ऑपरेशन सिंदूरच्या यशावर विशेष भर असेल. विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या जवळपास पाच हजार नागरिकांना लाल किल्ल्यात होणाऱ्या कार्यक्रमाचं निमंत्रण देण्यात आलं आहे. यात समावेश असलेल्या देशभरातल्या २१० सरपंचांपैकी १५ सरपंच महाराष्ट्रातले असून यात नऊ महिला सरपंच आहेत. स्वातंत्र्य दिनाच्या संध्याकाळी विविध लष्करी आणि निमलष्करी दलांचे वाद्यवृंद देशभरातल्या सुमारे १४० ठिकाणी सादरीकरण करणार आहेत.

**<><><><>**

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी एकोणऐंशीव्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. हा दिवस अनेक ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिक, क्रांतिकारक आणि सामान्य नागरिकांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी दिलेल्या बलिदानाची आठवण करून देतो, असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><>**

भारताच्या एकोणऐंशीव्या स्वातंत्र्य दिनाचा राज्यातला मुख्य शासकीय सोहळा उद्या मुंबईत मंत्रालयात होणार आहे. सकाळी नऊ वाजून पाच मिनिटांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. राज्यपाल सी. पी.

राधाकृष्णन यांच्या हस्ते पुण्यात ध्वजारोहण सोहळा होईल. ठाणे इथं जिल्हा मुख्यालयात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते तर बीड इथं उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. नाशिक इथं राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते तर रायगड जिल्ह्यात राज्याच्या महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे.

**<><><><><>**

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर एकंदर १ हजार ९० जणांना शौर्य आणि सेवा पदकं जाहीर करण्यात आली. यात पोलीस, अग्निशमन दल, होम गार्ड, नागरी संरक्षण आणि कारागृह सेवेतल्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. २३३ जणांना शौर्य पदक, ९९ जणांना अतिविशेष सेवेसाठी राष्ट्रपती पदक आणि ७५८ जणांना विशेष सेवेसाठी पदक जाहीर झाल्याची माहिती गृहमंत्रालयानं दिली. यात राज्यातल्या पोलीस सेवेतल्या ४९, अग्निशमन सेवेतल्या ८, होमगार्ड ५, तर कारागृह सेवेतल्या ८ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. राज्यातल्या पुरस्कार विजेत्यांविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधींकडून

***व्हाइस कास्ट***

*गडचिरोली पोलीस दलातले सात अधिकारी आणि अंमलदारांना राष्ट्रपती शौर्यपदक जाहीर झालं आहे. गडचिरोली पोलीस दलातले सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक मनोहर महाका, लचमा पेंदाम, प्रकाश कन्नाके, अतुल येगोलपवार आणि हिदायत खान यांना शौर्य पुरस्कार देण्यात येणार आहेत. शहीद पोलीस शिपाई सुरेश तेलामी यांना मरणोत्तर हा पुरस्कार दिला जाईल. २०१७ मध्ये भामरागड तालुक्यात नक्षल्यांनी भूसुरुंग स्फोट घडवून पोलिसांवर हल्ला केला होता. यावेळी पोलिसांनी त्यांचा धैर्याने प्रतिकार केला. याशिवाय पोलीस महानिरीक्षक अनिल कुंभारे, पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्यासह एकूण ३ जणांना राष्ट्रपती विशिष्ट सेवा पदक*

*जाहीर झालं आहे. तर ३९ पोलिस, ५ गृहरक्षक आणि ८ कारागृह सेवेतल्या अधिकारी कर्मचाऱ्यांना अत्यकृष्ट सेवा पदक जाहीर झालं आहे.*

**<><><><>**

मुंबईकरांचं हक्काच्या घराचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी शासन सातत्यानं काम करत असून बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातल्या सदनिकांचं वितरण कार्यक्रमाद्वारे यावर एका प्रकारे मोहोर उमटवली आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केलं. या प्रकल्पातल्या ५५६ सदनिकांचं वितरण त्यांच्या हस्ते आज झालं, त्यावेळी ते बोलत होते. बीडीडी चाळ म्हणजे मुंबईच्या सामाजिक-आर्थिक परिवर्तनाचा जीवंत इतिहास आहे, तिच्या पुनर्विकासाची वर्षानुवर्षं प्रलंबित असलेली मागणी या सरकारने पूर्ण केली, असं ते म्हणाले. या धर्तीवर धारावी पुनर्विकास प्रकल्पही यशस्वी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विकास हे महायुती सरकारचं एकमेव ध्येय असून पुढच्या दीड वर्षांत मुंबई खड्डेमुक्त करू, असं आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलं. महायुती सरकारच्या धोरणांमुळे मुंबईकरांच्या जीवनात अमूलाग्र बदल होईल, रखडलेले प्रकल्प पूर्ण होईल आणि झोपडपट्टीमुक्त मुंबईचं स्वप्न साकार होईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी बोलताना दिली.

**<><><><>**

मुंबईचा किनारी रस्ता उद्यापासून २४ तास वाहतुकीसाठी खुला असेल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली. मुंबई किनारी रस्त्यावरचं विहार क्षेत्र आणि चार पादचारी भुयारी मार्गाचं लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज झालं, त्यावेळी ते बोलत होते. काही वर्षांपूर्वी पाहिलेलं एका तासात मुंबईचं स्वप्न आता लवकरच पूर्ण होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. आज लोकार्पण केलेले प्रकल्प हे फक्त कॉंक्रीट, स्टील आणि तंत्रज्ञानाची कमाल नसून मुंबईच्या

भविष्याची गती, गुणवत्ता आणि सुरक्षिततेची हमी आहे, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

**<><><><><>**

HSRP अर्थात उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक असलेली नंबर प्लेट लावण्यासाठी राज्य सरकारनं ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यानंतर HRSP नंबर प्लेट नसणाऱ्या वाहनांवर कारवाई केली जाईल, असं सरकारनं कळवलं आहे.

**<><><><><>**

एकोणऐंशीव्या स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर आज राज्यभरात तिरंगा यात्रा निघत आहेत. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

***होल्ड… व्हीसी- तिरंगा रॅली***

*तिरंगा यात्रेसोबतच विविध कार्यक्रम आणि उपक्रम राज्यभरात आज आयोजित करण्यात आले. यवतमाळमध्ये आदिवासी विकास मंत्री अशोक उइके यांच्या मुख्य उपस्थितीत तिरंगा यात्रा काढण्यात आली. ठाणे जिल्हा परिषदेतर्फे आज तिरंगा सन्मान शपथ कार्यक्रम पार पडला. कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. बीड शहरात आज तिरंगा रॅली काढण्यात आली. धुळे शहरातून १ हजार १११ फूट लांब तिरंगा ध्वजासह पदयात्रा काढण्यात आली. पालघर जिल्ह्यात बाईक रॅलीचं आयोजन करण्यात आलं. धाराशिव शहरात सायकल रॅली काढण्यात आली. परभणीजवळच्या ओंकारेश्वर विद्यालयाच्या वतीनं आज तिरंगा रॅली आयोजित करण्यात आली. सांगली, मिरज आणि कुपवाड इथं झालेल्या तिरंगा सायकल रॅलीत १६ शाळांनी भाग घेतला. हिंगोली जिल्हा भाजपाच्या वतीनं जिल्ह्यात तिरंगा रॅली काढण्यात आली. बुलडाणा जिल्ह्यातल्या आदिवासी पाड्यांसह इतर सर्व ठिकाणी आज हर घर तिरंगा अभियानांतर्गत विविध कार्यक्रम घेण्यात आले. मालवणमध्ये आज दुचाकीवरून तिरंगा रॅली काढण्यात आली, तर सावंतवाडीत तिरंगा दौड स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं. गडचिरोलीत मॅरेथॉन आणि जनजागृती रॅली घेण्यात आली.*

**<><><><><>**

गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यासाठीचा शासन आदेश आज जारी करण्यात आला. याअंतर्गत भजनी मंडळांना ५ कोटी रुपयांपर्यंत अनुदान दिलं जाणार आहे. राज्य सरकार राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देणार आहे. याशिवाय अध्यात्म नाट्यरंग महोत्सव आणि ड्रोन शोचं आयोजित केला जाईल. राज्यातल्या उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांना पारितोषिकं देणं, राज्य व्याख्यानमालेचं आयोजन, राज्यातल्या प्रमुख

गणेश मंदिरांचं तसंच सार्वजनिक गणेशोत्सवांचं ऑनलाईन दर्शन घेता यावं यासाठी पोर्टलची निर्मिती, घरगुती गणेशोत्सवाची छायाचित्रं अपलोड करण्यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्मची निर्मिती, रील्सच्या स्पर्धा वगैरे भरगच्च कार्यक्रम या अंतर्गत आयोजित केले जाणार आहे.

**<><><><><>**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात पुढचे दोन दिवस तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. कोकणात किनारपट्टी भागात सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता असून मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा इशाराही हवामान विभागानं दिला आहे.

**//<><><><><>//**